
# पंचधारा

वर्ष ६५ वे, अंक दुसरा
जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३
अधिक श्रावण ते भाद्रपद १९४४



## माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांक

मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद
RNI Reg. No. 32307/79
मूल्य : रु. २००/-

**कार्यवाह**
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.
**भ्रमणध्वनी :** ७८४२८५३९८४
(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावे.

**प्रकाशक**
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क :** म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षांची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. ७८४२८५३९८४
संपर्कासाठी : MAIL ID : mspaphydgmail.com

पंचधारा वर्गणी Marathi Sahity Parishad
IDBI Bank, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125 किंवा Panchdhara
A/C. No. 59410010001359, IFSC Code – IBKL0000594
(For both accounts) या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. ४००/-
तीन वर्षांची वर्गणी रु. १०००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. ४०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती
या अंकाचे मूल्य : रु. २००/-
टपाल खर्च : रु. ३५/-

अक्षरजुळणी व मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, पुणे ३०.

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या अंकात प्रकट झालेल्या मतांशी आणि निष्कर्षांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


संपादकीय .................................................................................... ५

**भावपूर्ण श्रद्धांजली :**
मला भावलेल्या मालिनीताई राजूरकर ................ भारत देगलूरकर .................. ९

माध्यमांतराच्या अध्यापन-संशोधनातील अडचणी... प्रा. चिन्मय मधू घैसास
डॉ. योगेश शेळके ............ १४

रंग किरमिजी :
काव्य ते गीत : सर्जनाचा चिद्विलास ................ प्रवीण दवणे ................... १९

मराठी कादंबरीचे चित्रपट माध्यमांतर ................ डॉ. राजेंद्र थोरात ............... २३

पेशवाईवर आधारित ऐतिहासिक
कादंबऱ्यांचे प्रकारांतर आणि माध्यमांतर ............ डॉ. विनय मडगांवकर.......... ३३

ग्रामीण कादंबऱ्यांचे माध्यमांतर :
(निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात) .................... प्रा. विनायक ल. बापट ....... ४७

लोककला आणि लोकसमजुतींवर आधारित
कादंबऱ्यांचे माध्यमांतर : (चंद्रमुखी आणि जोगवा
चित्रपट यांच्या विशेष संदर्भात)........................ प्रा. जयेश गावकर............. ५७

'महानंदा' कादंबरीचे माध्यमांतर :
नाटक : गुंतता हृदय हे ................................ हेमंत बाळकृष्ण अय्या ......... ६९

माध्यमांतरातील आधुनिक आयाम :
कादंबरी ते वेबसेरिज .................................. तन्वी चाफाडकर ............. ७८

चरित्र-आत्मचरित्रात्मक साहित्यकृतींचे माध्यमांतर .. प्रा. चिन्मय मधू घैसास ....... ८६

चरित्र ग्रंथावरून चित्रपटनिर्मिती :
एक आनंददायी अनुभव .............................. डॉ. विद्या देवधर .............. ९६

नाटक ते सिनेमा : माध्यमांतर ........................ डॉ. गायत्री शिरोळे .......... १०६

कथेचे माध्यमांतर : 'जगावेगळा संसार'
या कथेच्या अनुषंगाने ................................ पूर्वा पंडित वस्त ............ १११

वरनभात लोन्चा नि कोन नाय कोन्चा :
कथेचे माध्यमांतर .................................. रोहिणी नेवरेकर .............. १२०

व्हिक्टर ह्यूगोच्या साहित्याचे माध्यमांतर ............ क्षमा धारवाडकर ............ १२८

**पुस्तक परीक्षण :**

१ 'दीपस्तंभ' : एक महत्त्वपूर्ण दस्तावेज ...... डॉ. शुभांगी पातुरकर ......... १३५
२ मंतरलेली उन्हे ................................ प्रा. हिरा वाघ ................ १३९
३ युगभान जागवणारी कविता .................. अंजली कुलकर्णी ............ १४२

मराठी साहित्य परिषद कार्यवृत्त .............................................................. १४७

लेखक परिचय ....................................................................................... १५०

स्वागत नव्या पुस्तकांचे ........................................................................ १५५

■

# कथेचे माध्यमांतर : 'जगावेगळा संसार' या कथेच्या अनुषंगाने



पूर्वा पंडित वस्त

## माध्यमांतर

मानवाच्या विकासाबरोबर मानवाच्या गरजेनुसार अभिव्यक्तीची माध्यमे आज बदललेली दिसून येतात. साहित्य, श्राव्य, दृकश्राव्य अशी अभिव्यक्तीची अनेक माध्यमे आहेत. आज कलात्म व सर्जनशील अशा अभिव्यक्तीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. चित्रपटासारखे माध्यम बहरत आहे. आशय, अभिव्यक्तीमध्ये गरजेनुसार अनेक बदल आज चित्रपटसृष्टीमध्ये होत आहेत. चित्रपटांना मिळणारा प्रतिसाद पाहता चित्रपटसृष्टी म्हणजे 'इंडस्ट्री' झाल्याचे आपल्याला पाहायला मिळते. उत्तमोत्तम पटकथांची निर्मिती व प्रगतशील अशा तंत्रज्ञानाचा वापर करत आज चित्रपट निर्मिती होत आहे. अनेक सर्जनशील अशा साहित्यकृतींची चित्रपटात माध्यामांतरे होत आहेत. 'वस्तूचे ज्ञान ग्रहण करणे आणि तिचे आस्वादकाचे अर्थ निश्चित करणे ही ज्ञानाच्या पुनर्मांडणीची क्रिया ही माध्यमांतराची क्रिया होय.'[१] 'माध्यमांतर ही ज्ञाननिर्मितीची क्रिया'[२] अशी माध्यमांतराविषयीची मते डॉ. अनिल सपकाळ यांनी नोंदविली आहेत. वाङ्मयप्रकारांच्या पलीकडे जाऊन भिन्न माध्यमांच्या साच्यात आकार घेणाऱ्या सर्जनशील अशा कलात्म अभिव्यक्तीच्या निर्मितीप्रक्रियेला माध्यमांतर म्हणावे लागते.

## कथेचे माध्यमांतर

साहित्यकृतीचे चित्रपटात माध्यमांतर होत असताना पटकथा हा घटक अत्यंत महत्त्वाचा ठरतो. कथेचे चित्रपटात माध्यमांतर होणाऱ्या प्रक्रियेत कथेचे पटकथेत रुपांतर होणे हा कथेच्या माध्यमांतराच्या दृष्टीने पहिला टप्पा म्हणावा लागेल. माध्यमांतरात कथेचे महत्त्व स्पष्ट करताना रमेश इंगळे लिहितात, 'रूपांतराचा प्रवास कथेपासून सुरु होतो'[३]. कथेचे पटकथेत रुपांतर होत असताना मूळ कथेचा आशय बदलणार नाही याची दक्षता पटकथाकाराला घ्यावी लागते. यावेळी कथाकार व पटकथाकार यांमध्ये समन्वय असणे गरजेचे ठरते कारण पटकथाकार प्रेक्षकांच्या

नजरेचा विचार करत पटकथा लिहित असतो. कथाकाराने मांडलेल्या मुलभूत स्वरूपाच्या आशयाचा पटकथाकार प्रेक्षकांच्या दृष्टीचा विचार करतो. कॅमेरा, अँगल, अभिनय, प्रकाशयोजना, ध्वनिसंकलन, नेपथ्य या चित्रपटाच्या तंत्रातील साच्यात त्याला बसवण्याच्या प्रयत्नात असतो. हे सर्व करत असताना पटकथाकाराकडून कथेच्या आशयाबरोबर मूळ कथेतील अन्य महत्त्वाच्या घटकांचाही अभ्यास होणे महत्त्वाचे ठरते. अभिनय हे चित्रपटाचे मुलभूत अंग. अभिनय साकारणारी अनेक पात्रे पटकथाकार रचित असतो. इथे पात्रांचे अंतरबाह्य चित्रण करण्यास पटकथाकाराचा कस लागतो. पात्रांची वेशभूषा, बोलण्याची लकब, संवाद या सर्व गोष्टींवर भर देण्याबरोबर मूळ कथेत शब्दांच्या माध्यमातून आकार दिलेल्या पात्रांच्या मनोवृत्तीसही संवादांच्या माध्यमातून तंतोतंत उतरविण्यास पटकथाकारास भाग पडते. पात्रचित्रणाच्या स्वरूपानुसार द्विमिती व्यक्तिरेखा (Flat) म्हणजेच भरीव नसलेल्या व्यक्तिरेखा आणि त्रिमिती व्यक्तिरेखा (Round) म्हणजे भरीव अशा व्यक्तिरेखा असे दोन प्रकार कथाभ्यासक ई. एम. फोर्टरने मांडले आहेत. ह्या पात्रांच्या स्वरूपाच्या अनुषंगाने विचार करता कोणते पात्र गडदपणे व्यक्त होणे गरजेचे आहे याची काळजी पटकथाकाराला घ्यावी लागते. कारण याची दक्षता न घेतल्यास मूळ आशयामध्येच बदल घडून येण्याची शक्यता निर्माण होते. त्या पात्रांच्या आयुष्यातील प्रसंग व घटनाक्रमांच्या आधारे कथेची निर्मिती होत असते. या घटना प्रसंगांचा क्रम साधला जाणे गरजेचे ठरते. त्याचबरोबर मूळ कथानकाला चित्रपटासारख्या दृकश्राव्य माध्यमातून गती देण्याच्या प्रयत्नात घटनाप्रसंगांची फेरमांडणी, अधिक घटना-प्रसंगांची जोडही प्रेक्षकाभिरुचीनुसार अनेकदा पटकथाकाराला द्यावी लागते. चित्रपटाचा पल्लाही अधिक असल्याकरणाने मूळ कथेची घोडदौड चालू ठेवण्याबरोबर, प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याच्या हेतूनेही पटकथाकारालाही निर्मिती स्वातंत्र्य देणे महत्त्वाचे ठरते. पण हे करत असताना मराठीतील प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या म्हणण्याप्रमाणे, 'चित्रपट हा ओंजळीतून पाणी घेऊन येण्याचा प्रकार असून त्याच्या आशयाची गळती होऊ न देण्याची मोठी जबाबदारी असते.''[४] कथेतील वातावरण माध्यमांतरातही अबाधित ठेवणे गरजेचे ठरते. प्रादेशिक, दलित, ग्रामीण, महानगरीय अशा अनेक साहित्य प्रवाहांतर्गत निर्माण झालेल्या कथांचे माध्यमांतर होत असताना ते वातावरण टिकवणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. अनेकदा मूळ कथाकार ज्या जीवनानुभवांना सामोरे गेलेला असतो किंवा ज्या सांस्कृतिक परिवेशात वावरलेला असतो त्यासंदर्भात पटकथाकार अगदीच अनभिज्ञही असू शकतो. त्यामुळे पटकथाकारास मूळ

कथाकारांच्या सामाजिक, सांस्कृतिक जाणिवा समजून घेत त्याचा एकूण परिवेश समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. वरील सर्व घटकांचे निवेदन कथेच्या माध्यमातून होत असते. निवेदनाच्या भिन्न पद्धतींचा विचार करत निवेदन हा कथेचा महत्त्वाचा घटक ठरतो. मूळ कथेची निवेदनपद्धतीही भिन्न क्लृप्त्यांचा वापर करत आज माध्यमांतरात साधलेली दिसून येते. 'पुनःप्रत्यक्ष' (फ्लॅशबॅक) सारख्या तंत्राचा वापर करून निवेदनाची वैशिष्ट्यपूर्णता अबाधित ठेवली जाते.

**गोमंतकीय कथेचे माध्यमांतर**

गोमंतकीय कथेचा विचार करता गोमंतकीय कथांमधून प्रदेशनिष्ठा दिसून येते. 'गोमंतक' भारतातले क्षेत्रफळाच्या दृष्टीने अत्यंत लहानगे राज्य असले तरी भरभरून निसर्गसौंदर्य बहाल झालेला हा प्रदेश. या प्रदेशाच्या सांस्कृतिक, सामाजिक जीवनजाणिवाही भिन्न. या जीवनजाणिवांसह प्रादेशिक वैशिष्ट्यांमुळे आकार घेणारे इथले समाजजीवन व जीवनानुभव अनेक साहित्यप्रकारांच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न झालेला आहे. कथा हे अत्यंत प्रभावी असे माध्यम, ज्या माध्यमाच्या आधारे गोमंतकीय समाजजीवन व प्रदेशनिष्ठा दर्शवण्याचा प्रयत्न झाला. प्रदेशनिष्ठ स्वरूपाच्या जीवनानुभवाबरोबर सार्वत्रिक अशा जीवनानुभवांना स्पर्श करण्याचा प्रयत्न गोमंतकीय कथाकारांकडून झाला. सर्वश्री लक्ष्मणराव सरदेसाई, पंडित महादेवशास्त्री जोशी, बा. भ. बोरकर अशा अनेक गोमंतकीय कथाकारांनी गोमंतकीय प्रदेशनिष्ठा टिकवत सार्वत्रिक स्वरूपाचे जीवनानुभव कथेतून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. विषय-आशयदृष्ट्या अत्यंत प्रभावी ठरलेल्या या गोमंतकीय कथा मध्यामांतरित स्वरूपातही आस्वादकांपर्यंत पोहोचल्या. दृक श्राव्य स्वरूपातील अत्यंत प्रभावी अशा चित्रपटासारख्या माध्यमातून या गोमंतकीय कथा माध्यामांतरित झाल्या. गोवा मुक्तीपूर्वकाळात पंडित महादेवशास्त्री जोशी यांच्या 'जगावेगळा संसार' या कथेचे 'कन्यादान' या चित्रपटात माध्यमांतर झाले. तसेच बा. भ. बोरकरांच्या 'पांघरुण' या कथेचे माध्यमांतर 'पांघरुण' या चित्रपटातून झाले. महेश मांजरेकर दिग्दर्शित या सिनेमाला २०२० सालाचा सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपटाचा पुरस्कारही प्राप्त झाला. कोकणी भाषेतील गोमंतकीय कथाकार डॉ. प्रकाश पर्येकर यांच्या अस्पृश्यतेवर भाष्य करणाऱ्या 'काजरो' या कथेवर आधारित 'काजरो' या सिनेमाला अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर सन्मान प्राप्त झाले. तसेच ६७ वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त झाला. गोमंतकीय साहित्यविश्वाचा विचार केल्यास मराठी व कोकणी भाषेतील साहित्याचे चित्रपटात माध्यमांतर

झालेले दिसते. चित्रपटात माध्यमांतरित झालेल्या अशा गोमंतकीय कथा प्रादेशिक जीवनानुभवावरोवर सार्वत्रिक स्वरूपाचे जीवनानुभव व्यक्त करत असल्याकारणाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चोखंदळ चित्रपटप्रेमी, चित्रपट अभ्यासकांना आकर्षित करत आहेत. श्रेष्ठ साहित्यकृतीच्या निकषांमध्ये सार्वत्रिकता हा महत्त्वाचा गुण ठरतो. प्रादेशिकतेच्या प्राथमिक रूपातून सार्वत्रिकतेकडे जाणारे 'कांतारा' सारखे दाक्षिणात्य चित्रपट जेव्हा जगभरातील चित्रपटसृष्टीवर धुमाकूळ घालतात, तेव्हा नवजीवनानुभव जाणून घेऊ पाहणाऱ्या बदलत्या समाजाभिरुचीची जाणीवही होते व कलाकृतींच्या श्रेष्ठतेचे आजच्या बदलत्या जगाच्या अनुषंगाने पुनर्मुल्यांकन करणेही महत्त्वाचे वाटते. आजच्या प्रादेशिक स्वरूपाच्या कथेवर आधारित चित्रपट जेव्हा यशस्वी होतो तेव्हा असे चित्रपट 'लोकल टू ग्लोबल' हा कानमंत्र यशस्वीरित्या पेलताना दिसून येतात. त्यामुळे अशा पद्धतीचे विषय मुळांकडून सार्वत्रिकतेकडे जेव्हा जातात तेव्हा कलाकृतीची यशस्विता आणि श्रेष्ठता अधोरेखित होते. या अभ्यासात उपरोल्लेखित गोमंतकीय कथांपैकी 'जगावेगळा संसार' या कथेचा खालीलप्रमाणे विचार केलेला आहे.


**'जगावेगळा संसार' या कथेचे माध्यमांतर**

गोवा मुक्तिपूर्व कालखंडात लिहिलेल्या 'जगावेगळा संसार' या गोमंतकीय कथेचे 'कन्यादान' या चित्रपटात माध्यमांतर झालेले आहे. कौटुंबिक स्वरूपाच्या या कथेत कौटुंबिक हेवेदावे मांडत. एक आदर्श सून चित्रित करत सुनेच्या भवितव्याचा विचार करणारा एक आदर्श सासरा लेखक चित्रित करतात. विधवा पुनर्विवाहाला विरोध करणाऱ्या सामाजिक प्रवृत्तीवरही लेखक भाष्य करून जातात. प्रथम पुरुषी निवेदनपद्धतीचा वापर केलेल्या या कथेत सासरा हा कथेचा निवेदक ठरतो. स्वगताच्या माध्यमातून आपल्या सुखी संसाराचे कथन करत पुढे मुलाच्या मृत्युनंतरच्या आपल्या स्थितीचे चित्रण करतो. सासरा व सून यांमधले भावनिक संघर्ष लेखक टिपण्याचा प्रयत्न करतात. माध्यमांतरीत चित्रपटात निवेदनपद्धतीशी फारकत घेतलेली दिसून येते; पण सासरा व सुनेमधले ऋणानुबंध मात्र चित्रपटातही यशस्वीपणे टिपलेले दिसून येतात. १९६० च्या सुमारास प्रसिद्ध झालेला, पंडित महादेवशास्त्री जोशींच्या कथेवर आधारित या सिनेमात पटकथालेखकाने मूळ कथेतील आशयाचे बहुआयाम अत्यंत चांगल्या पद्धतीने टिपल्याचे दिसून येते. मूळ कथेमध्ये 'मुलाचा अकाली' मृत्यू झाल्यामुळे मुलाला गमावून बसलेले आई वडील व सुनेचा पुनर्विवाह झाल्यामुळे शेवटचा आधारही हिरावल्यामुळे निर्माण झालेले

भावनिक ताण, अशा अनेक घटना प्रसंगांचे निवेदन सासरा 'पुनःप्रत्यक्ष' (फ्लॅशबॅक) पद्धतीचा वापर करून करतो. चित्रपटात मात्र सासरा हा निवेदक म्हणून दिसून येत नाही. चित्रपटात लष्करात असलेल्या कुमार या त्याच्या मुलाचे खुशाली कळवणारे पत्र येणे, घरात कुमारच्या लग्नासाठी मुली पाहण्याची लगबग व कथानकाच्या गरजेनुसार एकूण कथेत आलेले घटनाप्रसंग असा बदल सिनेमात झालेला दिसून येतो. उदा. कथा जेव्हा मध्य गाठते तेव्हा कथेतील महत्त्वाचे पात्र 'कुमार' याचा लष्करात कार्य करत असताना परदेशी रणभूमीवर अंत झाल्याचा धक्का वाचकांना देण्यात येतो. चित्रपटात ही घटना मध्य गाठतानाच आल्याची दिसते; पण ही घटना अधिक रंजक बनवण्यासाठी कुमारचे निधन ऐन मंगळागौरीच्या दिवशी बायकोच्या ओढीने घरी परतताना अपघात झाल्याचे दर्शविले आहे. चित्रपटाच्या घटनाप्रसंगांमध्ये जरी बदल झाला असला तरी मूळ आशयाशी चित्रपट फारकत घेताना दिसून येत नाही. आशयाचे भिन्न पैलू समर्थपणे उलगडण्यात चित्रपट यशस्वी ठरल्याचे दिसून येते.

'जगावेगळा संसार' या कथेच्या आकृतिबंधाचा विचार करताना डॉ. अर्चना पंडित लिहितात, 'कथेची सुरूवात, मध्य व शेवट एका भूमिकेत आढळतो व कथा पाच टप्प्यांतून जाते'[५]. पुढे त्या लिहितात, 'दुःख... आनंद... दुःख... आनंद...' अशा भावनांच्या चढउताराशी वाचक तन्मय होतो, असा अनुभव येतो.[६] कथेत सुरूवातीला वृद्ध जोडपे दुःखी असल्याची जाणीव जेव्हा वाचकाला होते तेव्हा, हे जोडपे दुःखी का? हे जाणून घेण्याच्या उत्कंठेने वाचक पुढची कथा वाचनास प्रवृत्त होतो. असाच नाट्यमय, उत्कंठावर्धक असा आकृतिबंध, या चित्रपट तयार होत असताना साधलेला आहे का? याची चर्चा खाली केली आहे.

रेखाचित्रातून माध्यमांतरात कलाकृतीच्या साधलेल्या घाटाचा विचार केल्यास



कथेतून चित्रपटात माध्यमांतरित होताना कथेच्या आकृतीबंधात, सुरुवात, मध्य, अंत या तिन्ही टप्प्यांवर बरीच मोडतोड चित्रपटकर्त्यांनी केलेली दिसून येते. यात आनंद...आनंद... दुःख... दुःख... आनंद... असा कथेच्या प्रवासात बदल जाणवतो. इथे कथेची जशी दुःखद पण उत्कंठावर्धक अशी सुरुवात झालेली आहे तशी चित्रपटात झालेली नसल्याने, आनंदमय अशा सुरुवातीमुळे चित्रपट प्रेक्षकांची उत्कंठा जागृत करत नाही. पुढे काय? हा प्रश्न मनात येऊन कथा वाचकांस प्रेरित करते पण चित्रपट मात्र आनंदमय अशी सुरुवातीची वातावरणनिर्मिती करून दुःखद असा मध्य गाठून अपेक्षित असा शेवट साधत सुखात्मिकेकडे वळतो. कथेतील आशयाची अनेक सूत्रे जरी चित्रपटात यशस्वीपणे उतरली असली तरी शेवटी कथेच्या तंत्रानुसार परिणामकारक अशा शेवटातून साधलेला एककेंद्रीपणा महत्त्वाचा ठरतो. 'जगावेगळा संसार' या कथेचा आणि 'कन्यादान' या चित्रपटाचा विचार केल्यास लक्षात येते की दोन्ही कलाकृतींचा शेवट वेगळ्या आशयसूत्रांना अनुसरून झालेला आहे. कथेत कथा निवेदक असलेल्या सासऱ्याला आपल्या सुनेचा पुनर्विवाह करून देऊन आपण पितृधर्म निभावल्याचे, सुनेने आपल्याला बाबा म्हणून हाक मारल्याचे समाधान आहे. कथेत निवेदक शेवटी म्हणतो की आपल्या अकाली वैधव्य आलेल्या विधवा सुनेचा विवाह करून मिळालेला आनंद हा आपल्या जीवनातील शेवटचा सुखक्षण आहे. असे म्हणत आपले आयुष्य अंधारात लोटल्याचे सूचित करत आपण एकाकी झाल्याची आपली शोकांतिका निवेदक शेवटी मांडतो. "पोरी, फिरून एकदा 'बाबा' म्हणून हाक मार मला. त्या शब्दांतल्या अमृतरसानं मला माझे हृदय भरून घेऊ दे!"[७] आपल्या पुत्रीतुल्य सुनेपासून ताटातूट होणार, या वियोगाचे दुख व्यक्त करणारा शेवट साधणारी ही कथा शोकात्मिक स्वरुपाची वाटते. सून व सासरा या दोहोंमधील नात्यातले भावबंध परिणामकारकपणे या कथेतून व्यक्त झालेले दिसून येते. चित्रपटाचा शेवट मात्र सुमित्रा व सूर्यकांत यांच्या प्रेमसाफल्याचा वाटतो. तसेच चित्रपटाच्या अखेरीस आलेल्या संवादात सासरा म्हणतो, "हे डोळ्यातले पाणी दुःखाचे नाही; आनंदाचे आहे. या पोरीमुळे कन्यादानाचे सुख मला मिळालं. पाणी सोडल्याशिवाय कुठलंही दान पूर्ण होत नाही." हा शेवट सकारात्मक वाटतो, सुखात्मिक ठरतो. चित्रपटात सूर्यकांत व सुमित्रा या दोघांमधील प्रेम रंगवण्याच्या प्रयत्नात प्रसंगांची भर पडल्यामुळे चित्रपट आणि कथेचा शेवट या दोहोंमध्ये बदल जाणवतो. 'जगावेगळा संसार' या कथेला लाभलेले कौटुंबिक वातावरण, कथेत आलेली पात्रे, संवाद या घटकांना 'कन्यादान' या चित्रपट माध्यमांतरात योग्य पद्धतीने न्याय दिलेला आहे.

### सर्जनशील कलात्म अभिव्यक्तीस्वातंत्र्य

'कन्यादान' हा चित्रपट गीते, संवाद, सूर्यकांत सारख्या पात्रांना अधिक गडद करत परिणामकारकपणे रूढ साच्यातल्या प्रेमकथेचे रूप स्वीकारताना दिसतो. हे करत असताना कथेतच्या मूळ आकृतिबंधाला थोडा धक्का पोहोचतो पण आशयसूत्र मात्र अबाधित राहते. चित्रपट निर्मितीमध्ये पटकथा लेखक, दिग्दर्शक, कलाकार, गीतकार, संगीतकार अशा भिन्न भूमिका निभावणाऱ्या अनेकांमुळे चित्रपट आकार घेत असतो. कथेत निर्माता हा सर्वस्वी कथाकार असतो. चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेत प्रेक्षकांच्या अभिरुचीचा विचारही होत असतो. कारण इथे चित्रपटाच्या सौंदर्यशास्त्राबरोबर अर्थशास्त्रालाही महत्त्व असते. त्यामुळे गरजेनुसार प्रसंगांची पेरणीही होते व चित्रपट कथेच्या साच्यात न मावता एक वेगळा आकृतिबंध स्वीकारतो. चित्रपट निर्मिती प्रक्रियेत सहभागी असलेल्या अनेकांच्या सर्जनशील कलात्म अभिव्यक्तीला वाव देण्यासाठी निर्मितीप्रक्रियेत कथेचे चित्रपटात माध्यमांतरामुळे झालेले बदल स्वीकृत करणे गरजेचे ठरते. कारण चित्रपट हा साहित्यापेक्षा वेगळा असतो. कथेचे स्वरूप लघु असल्याकारणाने अनेक घटना-प्रसंगांचे व्यापक पद्धतीने चित्रण करण्याऐवजी लेखक वाचकास मोकळ्या जागेमध्ये चिंतन करण्यास वाट ठेवतो. त्याच मोकळ्या जागेत दडलेल्या गोष्टी अतिरंजितपणे चित्रपटात रंगविल्या जातात व लघुकथेतून चित्रपटाची पटकथा आकार घेते. चित्रपट निर्मात्यांनी आपल्या सर्जनशील अभिव्यक्तीला चालना देण्यासाठी ही मोकळीक जरूर घ्यावी. पण कथेचे मूळ सूत्र तसेच अन्य आशयसूत्रांमध्ये तफावत जाणवणार नाही याची काळजी घ्यावी. परत कलाकार हा स्वच्छंद असतो. त्यामुळे माध्यमांतराच्या प्रक्रियेत माध्यमांतरित झालेली मूळ साहित्यकृती, त्या साहित्यकृतीचा आकृतिबंध, आशयसूत्रे, पात्रांची मनोवृत्ती, वातावरण इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी माध्यमांतरासाठी आकलन करून घेणे हा माध्यमांतराच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरतो. त्यामुळे पटकथा लेखक हा साहित्याचा कसदार वाचक, व त्या साहित्यप्रकाराचे रचनातंत्र जाणणारा एक चांगला समीक्षकही असणे गरजेचे आहे जेणेकरून मूळ कथेला माध्यमांतरातही न्याय मिळेल.

### निष्कर्ष

१. वाङ्मयप्रकारांच्या पलीकडे जाऊन भिन्न माध्यमांच्या साच्यात आकार घेणाऱ्या सर्जनशील अशा नवज्ञाननिर्मितीक्षम कलात्म अभिव्यक्तिच्या निर्मितीप्रक्रियेला माध्यमांतर म्हणावे लागते.

२. कथेचे चित्रपटात माध्यमांतर होणाऱ्या प्रक्रियेत कथेचे पटकथेत रुपांतर होणे हा कथेचया माध्यमांतराच्या दृष्टीने पहिला टप्पा म्हणावा लागेल.
३. पटकथाकारास कथेच्या आशयाबरोबर मूळ कथेतील अन्य महत्त्वाच्या घटकांचाही अभ्यास असणे महत्त्वाचे ठरते.
४. चित्रपटाचा पल्लाही अधिक असल्याकारणाने प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याच्या हेतूनेही पटकथाकारालाही निर्मितीस्वातंत्र्य देणे महत्त्वाचे ठरते, पण आशयात बदल होणे माध्यमांतरासाठी अयोग्य ठरते.
५. 'लोकल टू ग्लोबल' म्हणजेच आपल्या मुळांकडून सार्वत्रिकतेकडे जाणारे आजचे प्रादेशिक कथेवर आधारित चित्रपट यशस्वी होताना दिसतात.
६. 'जगावेगळा संसार' या कथेवर आधारित 'कन्यादान' या सिनेमात पटकथालेखकाने मूळ कथेतील आशयाने बहुआयाम अत्यंत चांगल्या पद्धतीने चित्रपटात टिपल्याचे दिसून येते.
७. कथेतील आशयाची अनेक सूत्रे जरी चित्रपटात यशस्वीपणे उतरली असली तरी शेवटी कथेच्या तंत्रानुसार परिणामकारक अशा शेवटातून साधलेला एककेंद्रीपणा महत्त्वाचा ठरतो. 'जगावेगळा संसार' ही कथा व 'कन्यादान' या चित्रपटातील आकृतिबंधात तफावत जाणवते.
८. 'जगावेगळा संसार' या कथेतील वातावरण, पात्रे, भाषा या घटकांना चित्रपट माध्यमांतरातही न्याय दिलेला दिसून येतो.
९. चित्रपट निर्मितीमध्ये पटकथा लेखक, दिग्दर्शक, कलाकार, गीतकार, संगीतकार अशा अनेकांच्या सर्जनशील अभिव्यक्तीला वाव असल्याने चित्रपटात बदल जाणवतात. प्रामुख्याने घटना प्रसंगात भर घातलेली दिसून येते.
१०. चित्रपट मोठा असल्याने व कथा लघुरूपी असल्याने मूळ आशय व आकृतिबंधाशी फारकत न घेता सर्जनशीलतेला वाव देत घातलेले बदल माध्यमांतरात स्वीकारणे गरजे ठरते.

**साधन सूची:**


१. https://youtu.be/7l-3gMOyG$Vs
२. जोशी, डॉ. सुधा. 'कथा : संकल्पना आणि समीक्षा'. प्रथम आवृत्ती. मौज प्रकाशन, २०१२.
३. हातकणंगलेकर, प्रा. म. द. 'मराठी कथा: रूप आणि परिसर', द्वितीय

आवृत्ती. पुणे: श्रीविद्या प्रकाशन, २००८.
४. जोशी, डॉ. सुधा. 'कथा : एक साहित्यप्रकार'. संपा - श्री. पु. भागवत, सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, शिल्पा तेंडुलकर, अंजली कीर्तने, 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार', वा. ल. कुलकर्णी गौरव ग्रंथ. मुंबई: मौज प्रकाशन गृह, १९८७.
५. https://www.cinestaan.com/articles/2020/mar/4/24775
६. संपा. - डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, प्रा. रवींद्र घवी, गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड पहिला (आरंभ ते १९६१). प्रथम आवृत्ती. पणजी गोवा: गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३.
७. संपा.- प्रा. एस्. एस्. नाडकर्णी, डॉ. सोमनाथ कोमरपंत, 'गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड दुसरा (मुक्तीनंतरचा कालखंड). प्रथम आवृत्ती. पणजी गोवा: गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. संपा. डॉ. राजेंद्र थोरात, प्रा. आशुतोष कसबेकर, 'साहित्यकृतीचे माध्यमांतर'. प्रथम आवृत्ती. पुणे: संस्कृती प्रकाशन, २०१७. पृ. क्र. २७
२. तत्रैवः पृ. क्र. २८
३. तत्रैवः पृ. क्र. ३७
४. तत्रैवः पृ. क्र. ३६
५. पंडित, डॉ. अर्चना. 'पंडित महादेवशास्त्री जोशी यांचे कथाविश्व.' द्वितीय आवृत्ती. पुणे: मधुश्री प्रकाशन, २०१५. पृ. क्र. २२३
६. तत्रैवः पृ. क्र. २२४
७. जोशी, पं. महादेवशास्त्री. 'खडकांतले पाझर'. द्वितीय आवृत्ती. पुणे: एस. जगन्नाथ आणि कंपनी, १९५५. पृ. क्र.१०२

■